**शाळा प्रवेशोत्सव याचे आयोजन करण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पीआरई २०१३/प्र.क्र.२०३/प्राशि-१

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ७ जून, २०१३.

**प्रस्तावना –**

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची भूमिका राज्य शासनाने कायम घेतली आहे. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

२. प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने वेळोवेळी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामध्ये भौतिक सुविधा निर्माण करतानाच शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता इत्यादीमध्ये सुधारणा केली आहे. राज्य शासनाकडून शालेय शिक्षणामध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध कार्यक्रमही राबविले गेले आहेत. या सर्व सकारात्मक उपाययोजना केल्यानंतरही काही बाबींमध्ये राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी, या कमतरता असणा-या बाबींमध्ये सुधारणा करण्याची शासनाची सदैव भूमिका आहे.

३. केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेत २००२ साली दुरुस्ती करुन, **६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण ( इ. १ ली ते ८ वी )** मिळण्याचा मूलभूत अधिकार प्रदान केला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** पारित केला आहे. त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून राज्यात सुरु आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी हा कायदा वैध ठरविला आहे. या अधिनियमातील कलम ८ व ९ नुसार शासन व स्थानिक प्राधिकरणाच्या विविध जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. त्यानुसार बालकाला शाळेत प्रवेश मिळवून देण्यापासून त्याचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता ८ वी पर्यंत) पूर्ण होईपर्यंत विविध बाबींवर कार्यवाही नमूद आहे.

शाळेत प्रवेश घेताना बालकाला उत्साहवर्धक व आनंददायी वातावरण दिसले तर त्याचा शाळेकडील ओढा अधिक वाढेल असे सर्वसाधारण अनुमान आहे. या पार्श्वभूमीवर सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू होण्याच्या प्रथम दिवशी नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचा कार्यक्रम आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

## शासन निर्णय -

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू होण्याच्या प्रथम दिवशी सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागतासाठी प्रवेशोत्सव हा कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा कार्यक्रम विदर्भामध्ये दिनांक २६ जून, २०१३ रोजी तर उर्वरित महाराष्ट्रात दिनांक १७ जून, २०१३ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

२. या कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे राहिल.

i. **शाळा सुरू होण्याच्या पुर्व दिवशी** शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था तसेच स्थानिक सेवाभावी संस्था (युवक मंडळे, क्रीडा मंडळे, बचत गट, महिला मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ) यांच्या सहकार्याने शाळेत नव्याने प्रवेशित होणाऱ्या बालकांच्या घरी भेट देणे, पदयात्रा व शाळा परिसर स्वच्छता/ सुशोभीकरण करावे.याबाबत सविस्तर तपशील **परिशिष्ट-अ** प्रमाणे राहील.

ii. **शाळा सुरू होण्याच्या दिवशी** शिक्षकांनी वेळेवर उपस्थित राहून प्रभातफेरी आयोजन, विद्यार्थ्यांचे फुले देवून स्वागत, मोफत पुस्तक वितरण इ. कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था तसेच स्थानिक सेवाभावी संस्था (युवक मंडळे, क्रीडा मंडळे, बचत गट, महिला मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ) यांचे सहकार्य घ्यावे. सविस्तर तपशील **परिशिष्ट-ब** प्रमाणे राहिल.

iii. **शाळा सुरू होण्याच्या दिवशी** वेळेवर उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याची विनंती शाळा असणाऱ्या गाव/प्रभागात निवास असणाऱ्या स्थानिक जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या सदस्य/ पदधिकाऱ्यांना करण्यात यावी. या प्रमाणे सदस्यांचे निवासस्थान शाळा असणाऱ्या गाव/प्रभागात नसल्यास स्थानिक ग्रामपंचायतीचे सरपंच/उपसरपंच तसेच ज्येष्ठ सदस्य यांचेव्दारा स्वागत करावे.

iv. जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी जिल्हयाचे पालकमंत्री व स्थानिक मंत्री महोदय यांना जिल्हयातील एका शाळेत या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची विनंती करावी.

v. गट शिक्षणाधिकारी/ शिक्षणाधिकारी म.न.पा. यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संसद सदस्य व विधीमंडळ सदस्य यांना जिल्हयातील एका शाळेत या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची विनंती करावी.

vi. या कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी.

vii. सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी, उपसंचालक, सहसंचालक, संचालक, डायट प्राचार्य यांनी किमान एका शाळेवर उपस्थित राहावे.

viii. शिक्षण विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी राज्य शासनाच्या इतर विभागातील वर्ग-२ व त्यावरील अधिकाऱ्यांना या कार्यक्रमासाठी शाळा निहाय निमंत्रित करावे.

ix. शाळेच्या प्रथम दिवशी मध्यान्ह भोजन योजनेतील जेवणात गोड पदार्थाचा समावेश करावा.

x. शाळेच्या प्रथम दिवशी स्थानिक कलाकार अथवा माजी विद्यार्थी शाळेबाबत अथवा शिक्षणाबाबत सांस्कृतिक कार्यक्रम करणार असतील तर त्यास प्रोत्साहन दयावे.

xi. या कार्यक्रमासाठी येणारा खर्च सादिल निधी तसेच सर्व शिक्षा अभियानाच्या निधीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६०७१५२९५२४१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.06.07 15:51:54 +05'30'

( ना.उ.रौराळे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण),
३. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण),
४. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),
५. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),
६. मा. मुख्य सचिव याचे स्वीय सहायक,
७. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
८. सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, शासकीय परिवहन सेवा केंद्राजवळ,वरळी पोलिस कॅम्प, वरळी, मुंबई - २५
१२. सर्व जिल्हाधिकारी,

१३. सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
१६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७. शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१८. शिक्षण संचालक(प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,
२०. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
२१. संचालक,महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन
२२. मंडळ(बालभारती), पुणे,
२३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
२४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

## शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक :- पीआरई २०१३ / प्र.क्र.२०३ / प्राशि-१ , दिनांक ७ जुन, २०१३ चे सहपत्र

## शाळा पूर्व तयारी आणि पूर्वदिनी घरभेटी शैक्षणिक पदयात्रा

## परिशिष्ट " अ "

| अ.क्र. | दिवस | वेळ | उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | शाळा पूर्व दिवस दिनांक १६/०६/२०१३ दि. २५/०६/२०१३ | प्रात: ७.०० वाजता | सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांसह शिक्षकांचे शाळेत आगमन |
| २ | | सकाळी ७.०० ते ७.३० वाजता | ध्वनीवर्धकावर (लाऊड स्पीकरवर) उद्या शाळा सुरु होत असल्याचे सांगून उद्या आपल्या सर्व बालकांना सकाळी ७.०० वा. शाळेत पाठविण्याची विनंती करणे. गाव किंवा वार्ड मोठा असेल तर दोन किंवा तीन शिक्षकांचा गट तयार करुन घरभेटी, शैक्षणिक पदयात्रा काढावी. गावातील / वार्डातील प्रत्येक घरापर्यंत कुणीतरी जाणे अपेक्षित आहे. |
| ३ | | सकाळी ७.३० ते ९.०० वाजता | सरपंच, गावकरी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, युवक-बचतगट, जेष्ठ नागरिकांसह गावातील/ वार्डातील प्रत्येक घरांना प्रत्यक्ष भेट देणे. घरात प्रवेशपात्र बालक असेल तर प्रवेश फॉर्म भरुन घेणे. नसेल तर उद्या शाळा सुरु होत असल्याचे सांगून उद्या आपल्या सर्व बालकांना सकाळी ७ वाजता शाळेत पाठविण्याची विनंती करणे, गाव किंवा वार्ड मोठा असेल तर दोन किंवा तीन शिक्षकांचा गट तयार करुन घरभेटी, शैक्षणिक पदयात्रा काढावी. गावातील / वार्डातील प्रत्येक घरांपर्यंत कुणीतरी जाणे अपेक्षित आहे. |
| ४ | | सकाळी ९.०० ते १०.३० वाजता | युवकांच्या, गावक-यांच्या बचत गटाच्या सहाय्याने शाळा परिसर स्वच्छ करणे, सडा शिंपून रांगोळी काढणे, आंब्याच्या किंवा उपलब्ध असलेल्या पानां-फुलांची तोरणे बांधणे, ध्वनी-वर्धकावर देशभक्तीवर गीत वाजविणे (लावणे). |

## शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक :- पीआरई २०१३/प्र.क्र.२०३/ प्राशि-१,दिनांक ७ जुन २०१३ चे सहपत्र

## शाळेच्या पहिल्या दिवशी करावयाची कार्यवाही.

## परिशिष्ट " ब "

| अ.क्र. | दिवस | वेळ | उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | शाळेचा पहिला दिवस दि. १७/६/२०१३ व दि. २६/०६/२०१३ | सकाळी ७.०० वाजता | सर्वांनी शाळेत उपस्थित राहणे |
| २ | | सकाळी ७.०० ते ७.३० वाजता | गावात/ वार्डात देशभक्तीपर गीते/ गात, नारे देत प्रभात फेरी काढणे, युवक , गावकरी, जेष्ठ नागरीकांना प्रभात फेरीमध्ये सहभागी होण्याची विनंती करणे |
| ३ | | सकाळी ८.०० ते ९.०० वाजता | पुस्तक दिनानिमित्य शालेय व्यवस्थापन समितीच्या उपस्थितीत सर्व बालकांना मोफत पाठयपुस्तकाचे वितरण करणे इ. १ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या बालकांचा उपलब्ध असलेली फुले देऊन स्वागत / कौतुक करणे |
| ४ | | सकाळी ९.०० ते १०.०० वाजता | वर्षभर १००% उपस्थिती ठेवणेसाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती देणे एकही विदयार्थी शाळाबाहय राहणार नाही, याची सर्वांना प्रतिज्ञा देणे |
| ५ | | सकाळी १०.०० वाजता | १००% उपस्थितीसह प्रत्यक्ष वर्गाध्यापन अध्यापनास प्रारंभ करणे |